महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र.तंशिविकापु/विवि-१/वृक्षलागवड/२०२१/५८२६
दिनांक : 27 DEC 2021

प्रति
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व संस्था
(पुणे विभाग पुणे)

विषय :- सन २०१७ ते २०१९ या वर्षामध्ये दरवर्षी जून, जुलै महिन्यात एकंदर ३ वर्षाच्या कालावधी मध्ये ५० कोटी वृख लागवडीच्या कार्यक्रमाचा वर्षनिहाय नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करुन अंमलबजावणी करणे.

संदर्भ :- १) मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक, अर्थसंकल्प, नियोजन व विकास म. रा. नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-१/रोहयो/प्र.क्र.८/२०२१-२२/२४१, दि.१५.१२.२०२१.

२). मा.सदस्य सचिव, जिल्हा वृक्ष लागवड समिती, तथा उपवनसंरक्षक, वनविभाग, सांगली यांचे पत्र जा.क्र.ब/कक्ष-योजना/२०२१-२२/२१८५, दि. २३.१२.२०२१.

उपरोक्त विषयाच्या संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये, मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक, अर्थसंकल्प, नियोजन व विकास म. रा. नागपूर यांनी सन २०१७ ते २०१९ या वर्षामध्ये दरवर्षी जून, जुलै महिन्यात एकंदर तीन वर्षाच्या कालवधी मध्ये ५० कोटी वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचा वर्षनिहाय नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करुन, अंमलबजावणी करणेच्या अनुषंगाने विहित प्रपत्रात माहिती सादर करणेबाबत कळविले आहे. (सोबत प्रत जोडली आहे)

त्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थाप्रमुखांना सूचित करण्यात येते की, ५० कोटी वृक्ष लागवडीबाबतची वर्षनिहाय व बिनचूक माहिती सोबत जोडलेल्या गुगल फॉर्मवर दिनांक २९.१२.२०२१ पर्यंत भरण्यात यावी. सदर विषयाची चुकीची माहिती सादर केल्याचे निदर्शनास आल्यास सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील याची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत - संदर्भीय पत्रांच्या छायांकीत प्रती
प्रत — या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करणेकरीता

महाराष्ट्र शासन
वन विभाग

दुरध्वनी क्रं. : ०२३३-२३४४६३९
Email-Id:-dycfsangli@gmail.com

## उप वनसंरक्षक, सांगली वन विभाग यांचे कार्यालय

हनुमान नगर,कुपवाड ता.मिरज जि. सांगली - ४१६४३६

जा.क्र.ब/कक्ष-योजना/२०२१-२२/२१८५ सांगली कुपवाड दि. २३/ १२ /२०२१

**हस्ते पोहोच/ कालमर्यादा**

प्रति,

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सांगली
२. जिल्हा कृषी अधिकारी,सांगली
३. सहकार व पणन विभाग,सांगली
४. कार्यकारी अभियंता सा.बां.वि.सांगली
५. कार्यकारी अभियंता सा.बां.वि.मिरज
६. उपजिल्हाधिकारी (रोहयो), सांगली
७. समाज कल्याण विभाग, सांगली
८. जिल्हा रेशिम विभाग सांगली
९. महिला व बालकल्याण जि.प. सांगली
१०. जिल्हा उदगोग केंद्र, सांगली
११. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोदयोग मंडळ, सांगली
१२. उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मं.सांगली
१३. कार्यकारी अभियंता, म.औ.वि.म.सांगली
१४. उपप्रादेशिक परिवहन, कार्यालय सांगली
१५. विभागीय अभियंता,म.रा.प.म.सांगली
१६. जिल्हा दुग्ध विकास अधिकारी सांगली-मिरज
१७. जिल्हा क्रिडा अधिकारी, सांगली
१८. सहा.आयुक्त मत्स्य व्यवसाय, सांगली
१९. जि.व्य.शि.व प्रशि.अधिकारी सांगली
२०. महाप्रबंधक दुरसंचार कार्यालय, सांगली
२१. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग कोल्हापूर
२२. समाज कल्याण विभाग सांगली
२३. सार्वजनिक आरोग्य विभाग, सांगली
२४. राष्ट्रीय महामार्ग विभाग, कोल्हापूर
२५. पुणे गृहनिर्माण विभाग,सांगली
२६. सहा.कामगार आयुक्त कार्यालय सांगली
२७. जिल्हा व सत्र न्यायालय सांगली
२८. अधिक्षक अभियंता MSEB सांगली
२९.रेल्वे विभाग, मिरज
३०. जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली
३१. जलसंपदा विभाग, सांगली

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
23 DEC 2021
आवक क्र. 90LEL

३२.जलसंवर्धन विभाग, सांगली
३३. राज्य उत्पादन शुल्क विभाग,सांगली
३४. वस्तू व सेवा कर विभाग, सांगली
३५. पशूसंवर्धन विभाग जि.प.सांगली
३६. उपायुक्त पशूसंवर्धन विभाग राज्य
३७. शासकीय वैदयकीय महाविदयालय व रुगणालय, सांगली
३८. शिक्षणाधिकारी प्राथमिक विभाग जि.प. सांगली
३९. शिक्षणाधिकारी माध्यमिक विभाग जि.प. सांगली
४०. नगर विकास विभाग जि.प.सांगली
४१. सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिका
४२. जिल्हा कारागृह विभाग, सांगली
४३.सैनिक कल्याण विभाग, सांगली
४४. अन्न व औषध प्रशासन विभाग, सांगली
४५. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केद्र,सांगली
४६. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४७ सामाजिक न्याय व विशेष अर्थ सहाय्य विभाग, सांगली

**विषय :** सन २०१७ ते २०१९ या वर्षामध्ये दरवर्षी जुन, जुलै महिन्यात एकंदर तीन वर्षाच्या कालावधी मध्ये ५० कोटी वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचा वर्षनिहाय नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करुन अंमलबजावणी करणे.

संदर्भ : मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा. नागपूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-१/रोहयो/प्र.क्र.८/२०२१-२२/२४१ दि.१५.१२.२०२१

उपरोक्त विषयांकित प्रकरणी, वरील संदर्भिय पत्रान्वये मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा. नागपूर यांनी **सन २०१७ ते २०१९ या वर्षामध्ये** दरवर्षी जुन, जुलै महिन्यात एकंदर तीन वर्षाच्या कालावधी मध्ये ५० कोटी वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचा वर्षनिहाय नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करुन अंमलबजावणी करणेच्या अनुषंगाने विहित प्रपत्रात माहिती सादर करणेबाबत कळविले आहे. (प्रत संलग्न)

त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रात आपले अधिनस्त यंत्रणानी ५० कोटी वृक्ष लागवडबाबत **माहिती सात दिवसांत या कार्यालयास पाठविणेस विनंती**. जेणेकरुन वेळेत माहिती वरिष्ठ कार्यालयास सादर करणे सोईचे होईल.

**सोबत-वरीलप्रमाणे.**

( विजय माने, भा.व.से. )
सदस्य सचिव,
जिल्हा वृक्ष लागवड समिती,
तथा
उपवनसंरक्षक,
वन विभाग सांगली

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

वन विभाग

# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

## (प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर)

"वनभवन", दुसरा माळा, डी विंग, रामगिरी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर -४४० ००१

Phone NO . ०७१२-२५५०८७५ Email ID pccfbpd@mahaforest.gov.in

जा.क्रकक्ष-१/रोहयो /प्र.क्र.८/२०२१-२२/२४१ नागपूर-४४०० ०१, दिनांक १५ डिसेंबर, २०२१

By E-mail

प्रति,

विभागीय आयुक्त,
नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक/कोकण/पुणे

जिल्हाधिकारी (सर्व)

**विषय:- सन २०१७ ते २०१९ या वर्षांमध्ये दरवर्षी जून-जुलै महिन्यात एकंदर ३ वर्षाच्या कालावधी मध्ये ५० कोटी वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचा वर्षनिहाय नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करुन अंमलबजावणी करणे.**

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक: सावंवि-२०१६/प्र.क्र.८०/फ-११, दिनाक १० ऑक्टोबर, २०१६
२)महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक: सावंवि-२०१६/प्र.क्र.८०/(भाग-२)फ-११, दिनांक २५ जुलै, २०१८
३)या कार्यालयाकडील पत्र क्रमांक कक्ष-१५/आयसीटी/एफ.नं. ५९-VI/६९३/२०१८-१९, दिनांक ०२.११.२०१८
४)या कार्यालयाकडील कडील पत्र क्रमांक कक्ष-१५/आयसीटी/एफ.नं. ५९-VI/८१०/२०१८-१९, दिनांक ०५.१२.२०१८
५)या कार्यालयाकडील पत्र क्रमांक कक्ष-१५/आयसीटी/जिरोट/१३२/२०२१-२२, दिनांक १३.०७.२०२१
६)उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक ५०९०/म.वि.स/दिनांक १९ मार्च, २०२१

शासनाच्या उपरोक्त संदर्भित दिनांक १० ऑक्टोंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये (संदर्भ क्रमांक १) राज्यात ५० कोटी वृक्ष लागवडीचा महत्वाकांक्षी कार्यक्रम महाराष्ट्र शासनामार्फत हाती घेण्यात आला होता व यानुसार वन विभाग (वन विभागाकडील वन्यजीव शाखा, सामाजिक वनीकरण शाखा व वन विकास महामंडळासह) बरोबरच ग्राम पंचायती व इतर सर्व शासकीय विभागामार्फत सुध्दा रोपे लागवडीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. यांस अनुसरुन वन विभागाबरोबरच इतर सर्व संबंधित शासकीय विभाग व ग्राम पंचायती मार्फत संबंधित कालावधीमध्ये रोपे लागवडी करण्यात आली. रोपे लागवडी संदर्भात किती उद्दिष्ट साध्य झाले आहे याची नोंद घेण्यासाठी वन विभागामार्फत संगणक प्रणालीही विकसीत करण्यात आली तसेच रोपे लागवडी बद्दल तसेच जिवंत रोपांच्या टक्केवारीच्या संदर्भात वनयुक्त शिवार, मोबाईल ॲप चा वापर करुन

२.० उपरोक्त संदर्भित मोहिमे अंतर्गत करण्यात आलेल्या कामाबाबत विचारण्यात आलेल्या एका विधान सभा प्रश्नाच्या अनुषंगाने विधी मंडळाने तदर्थ समिती गठित केली आहे सदर समितीच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत झालेल्या चर्चे नुसार संबंधित कालावधीत इतर शासकिय विभागांनी केलेल्या (i) रोपे लागवडी संदर्भात (ii) सदरची रोपे खरेदी साठी केलेल्या खर्चाची आकडेवारी, विभाग निहाय, वर्ष निहाय, जिल्हा निहाय तसेच सदर खरेदी कोणत्या यंत्रणा कडून केली आहे (शासकीय किंवा खाजगी) या संदर्भातील माहिती समितीने अपेक्षीलेली आहे. त्याच बरोबर वन विभागा व्यतिरिक्त इतर शासकीय विभागामार्फत करण्यात आलेल्या रोप लागवडी संदर्भात जिवंत रोपांची टक्केवारी सुद्धा अपेक्षिली आहे. जिवंत रोपांच्या टक्केवारीच्या संदर्भात नमुद करण्यात येते की, या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ३, ४ व ५ अन्वये वनयुक्त शिवार मोबाईल ॲपचा वापर करुन आवश्यक माहिती नोंदविण्याबाबत सुचना निर्गमित करण्यात आल्या होत्या तथापी या बाबतीत इतर शासकीय विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाही बाबतची माहिती नोंदविण्यात आली नसल्याचे दिसून येते.

३.० उपरोक्त पार्श्वभूमीवर तसेच विधी मंडळाच्या तदर्थ समितीस आवश्यक माहिती उपलब्ध करुन देण्याच्या हेतुने आपणास विनंती करण्यात येते की, इतर शासकीय विभागांनी संबंधित मोहिमे अंतर्गत केलेल्या (i) रोपे लागवडी बद्दल (ii) रोपे उपलब्ध करण्यासाठी केलेल्या खर्चाबद्दल आणि (iii) लागवड केलेल्या जिवंत रोपांच्या टक्केवारी बद्दलची माहिती विभाग निहाय, वर्ष निहाय, जिल्हा निहाय सोबतच्या प्रपत्र -१, प्रपत्र-२ मध्ये भरुन या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

सहपत्र-वरील प्रमाणे.

प्रदीप
१५.१२.२०२१
(प्रदीप कुमार)
प्रधान मुख्य वनसंरक्षक,
(अर्थसंकल्प, नियोजन व विकास)
म.रा. नागपूर

प्रतिलिपी - प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती, तंत्रज्ञान व धोरण), नागपूर यांना माहिती करीता.

प्रपत्र-१

इतर शासकीय यंत्रणेने केलेल्या रोपे लागवडी बाबत सविस्तर माहिती

| इतर/ शासकीय /यंत्रणेचे नाव | जिल्हा | तालुका | गाव | लागवडीचे वर्ष | लागवड केलेल्या रोपांची संख्या | ज्या शासकीय/अशासकीय यंत्रणेकडुन रोपे खरेदी करण्यात आली त्यांचे नाव | रोपांची किंमत | जिवंत रोपांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

प्रपत्र-२

ग्रामपंचायत मार्फत केलेल्या रोपलागवडीची माहिती

| जिल्हा | तालुका | ग्रामपंचायत | लागवडीचे वर्ष | लागवड केलेल्या रोपांची संख्या | ज्या शासकीय/अशासकीय यंत्रणेकडुन रोपे खरेदी करण्यात आली त्यांचे नाव | रोपांची किंमत | जिवंत रोपांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |